REGISTERED No. B 3434

जाहीरातींचे दर.
खालील पत्त्यावर चोकशी करावी.
व्यवस्थापक, अर्थ,
' दुर्गाधिवास ' पुणें ४.

# अर्थ

वर्गणीचे दर.
वार्षिक वर्गणी
रु. ४
( टपाल हंशील माफ )
किरकोळ अंकास
एक आणा.

' अर्थ एव प्रधानः ' इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति ।

—कौटिलीय अर्थशास्त्र

संपादक—प्रो. वा. गो. काळे

वर्ष ६ | पुणें, बुधवार, तारीख २७ नोव्हेंबर, १९४० | अंक ४७

## प्रो. चिं. वि. जोशी

निर्मित ' चिमणराव ' या भूमिकेवर
आधारलेल्या—

## मा. विनायक

या तुमच्या आवडत्या दिग्दर्शकानें
दिग्दर्शित केलेल्या—

# " लग्न पहावं करून "

या नवयुगच्या मराठी विनोदी बोलपटांत



नवयुग चित्र

## दामुअण्णा मालवणकर

यांची मुख्य भूमिका आहे हें वाचतांच तुमच्या ओठावर हांसू आल्याशिवाय राहणार नाहीं.

★ ' पिअरलेस प्रकाशन ' — येत आहे ★

## स्पृहणीय यश

## बोनसचे दरांत २० टक्के वाढ

तारीख ३० एप्रिल १९३८ रोजीं झालेल्या
मूल्यमापनाचा निकालः

| हयातीनंतरचे विम्यावर | त्रैवार्षिक—दर हजारीं | हयातींतील विम्यावर |
| --- | --- | --- |
| रु. ५४ | बोनस | रु. ४५ |

आजच " कॉमनवेल्थ " ची पॉलिसी घेऊन
कंपनीचे उत्कर्षांत भागीदार व्हा.

## दि कॉमनवेल्थ ॲशुअरन्स

कंपनी लि० पुणें

लिहा अगर समक्ष भेटा.

श्री. रा. न. अभ्यंकर, बी. ए., एलएल. बी.
मॅनेजिंग एजंट.

सर्वत्र कार्यक्षम व विश्वासू एजन्ट आकर्षक अटींवर नेमणें आहेत.

## दहा हजार रुपयांचीं घड्याळें बक्षिस

" जौहरे हुस्न " ह्या आमच्या प्रसिद्ध रजिस्टर्ड औषधाच्या वापरण्यानें शरीराच्या कोणत्याहि भागावरील केस कांहींहि त्रास न होतां नाहींसे होतात आणि जन्मभर पुन्हां कधींहि त्या ठिकाणीं ते येत नाहींत. औषध लावलेली जागा रेशमासारखी मऊ, नरम व सुंदर होऊन जाते. बाटलीची किंमत फक्त १ रु. १४ आणे. ह्या औषधाच्या प्रसिद्धी खातर प्रत्येक बाटलीबरोबर एक फॅन्सी रिस्ट वॉच फुकट पाठवण्यांत येतें. हें घड्याळ अत्यंत सुंदर व मजबुत आहे. सौंदर्य व मजबुती ह्या विषयींची दहा वर्षांची गॅरंटी देण्यांत येते आणि गॅरंटीचा करारनामा प्रत्येक घड्याळाबरोबर पाठवण्यांत येतो.

सूचना—माल पसंत न पडल्यास त्याची किंमत परत केली जाते. तीन बाटल्या एकदम घेणारास टपाल हंशील माफ आहे आणि तीन घड्याळें बक्षिस मिळतात.

पत्ताः—लंडन कमर्शिअल कंपनी
पोस्ट बॉक्स नं. २७ ( A. P. ) अमृतसर—Amritsar.

# विविध माहिती.

### फिनॅन्स बिल

दुसऱ्या फिनॅन्स बिलाचें पहिलें वाचन मध्यवर्ती असेंब्लीनें नामंजूर केल्यानंतर व्हाइसरॉयांनीं तें फेरविचारासाठी असेंब्लीकडे पुनः पाठवलें, परंतु असेंब्लीनें तें पुनः नामंजूर केलें. व्हाइसरॉयांनीं तें पास झाल्याचें 'सर्टिफाय' करून कॉन्सिल ऑफ स्टेटकडे पाठविलें.

### कॉमिला बँकिंग कॉर्पोरेशन लि.

बंगालमधील वरील बँक मुंबई येथें येत्या जानेवारींत एक शाखा उघडणार आहे. शाखेसाठी एजंट व इतर नोकरवर्ग ह्यांची नेमणूक करावयाची आहे. त्यासाठी मुंबई प्रांतांतील नागरिकांची मुख्यतः निवड करण्यांत येणार आहे. कॉमिला बँकेची स्थापना १९२२ सालीं झाली. तिचें भरणा झालेलें भांडवल ८ लक्ष रुपये असून तिचे जवळ सुमारें १ कोटि, ८८ लक्ष रुपयांच्या ठेवी आहेत.

### हिंदी रेल्वेजचें उत्पन्न

| १ एप्रिल ते १० नोव्हेंबर | रु. |
|---|---|
| १९३८–३९ | ५५,७८,००,००० |
| १९३९–४० | ५६,२९,००,००० |
| १९४०–४१ | ६३,३०,००,००० |

### भत्ते वाढणार

हिंदी लष्करांतील सर्व अधिकाऱ्यांचे भत्ते वाढविण्यांत आले आहेत. १ डिसेंबर पासून ते अंमलांत येतील व युद्धसमाप्तिपर्यंत ते चालू रहातील.

### बंगालमधील साखरेचे कारखाने

बंगालमध्यें दरसाल १,३०,००० टन साखर खपते. त्या प्रांतांत सध्या १० साखर–कारखाने आहेत, त्यांतील ५ कारखाने फायद्यांत असून त्यांपैकीं एकहि कारखाना बंगाली मालकीचा नाहीं. सर्व कारखान्यांत मिळून १४ लक्ष मण, म्हणजे बंगालच्या मागणीपेक्षा २५ ते ३० लक्ष मण कमी साखर तयार होते.

### मि. बेव्हिन ह्यांची योजना

"हिंदुस्थानांतील कित्येक कामगारांस ग्रेट ब्रिटनमध्यें आणून त्यांस तेथील लोकांबरोबर रहाण्याची संधी देण्याची योजना मी भारतमंत्र्यांपुढें मांडली आहे. हिंदी कामगारांस त्यामुळें मजूर संघ व तत्सम संस्था ह्यांच्या कार्याची माहिती होईल. पूर्व आणि पश्चिम ह्यांचेमधील हा एक औद्योगिक दुवा निर्माण होईल. हिंदी कामगारांस ब्रिटिश उमेदवारांप्रमाणेंच पगार मिळेल." ब्रिटिश मजूर मंत्रि, मि. बेव्हिन ह्यांनीं कार्डिफ येथील आपल्या भाषणांत वरील माहिती दिली.

### असेंब्लीचें अधिवेशन

मध्यवर्ती असेंब्लीचें अधिवेशन २७ नोव्हेंबर रोजीं समाप्त होईल असा अंदाज आहे.

### पंजाबचा फायदा

हिंदुस्थान सरकारनें १ कोटि रुपये किंमतीच्या मालाची ऑर्डर पंजाब प्रांतांत दिली आहे.

### टेलिफोनचा दर

पुण्यांतील टेलिफोनचा दर त्याचा किती वेळां उपयोग करण्यांत येतो ह्यावर ठरविण्यांत यापुढे यावयाचा आहे. ही पद्धति ३० सप्टेंबर, १९४१ पासून अंमलांत येईल.

### अमेरिकेच्या चलनांतील रकमा रिझर्व्ह बँकेकडे वर्ग करा

अमेरिकेच्या चलनांत व्यक्त होणाऱ्या रकमा कोणाहि हिंदी मनुष्याचे ताब्यांत असतील, तर त्यानें त्या रिझर्व्ह बँकेच्या स्वाधीन केल्या पाहिजेत. त्यांचे बद्दली चालू हुंडणावळीचे दरानें होणारी त्यांची किंमत त्यास दिली जाईल, अशी डिफेन्स ऑफ इंडिया रूल्सच्या अन्वयें हिंदुस्थान सरकारनें नोटिफिकेशन काढली आहे. २५ डिसेंबरचे आंत ह्या रकमा रिझर्व्ह बँकेकडे आदा करण्यांत आल्या पाहिजेत. कायद्यास संमत असल्यास, अशा रकमा रिझर्व्ह बँकेस न दिल्या तरी चालतील.

### ऑस्ट्रेलियाचा युद्धखर्च

ऑस्ट्रेलियाचा चालू युद्धखर्च गेल्या वर्षाच्या मानानें ३½ पट व त्यापूर्वीच्या वर्षाच्या मानानें १४ पट झाला आहे.

### खरेदीवरील कमिशनची आकारणी

ब्रिटिश सरकारनें हिंदुस्थान सरकारच्या खात्यामार्फत हिंदुस्थानांत खरेदी केली, तर तिच्या किंमतीवर ३% दरानें हिंदुस्थान सरकार कमिशन आकारीत असे. सप्टेंबर, १९४० पासून ही आकारणी हिंदुस्थान सरकारनें बंद केली आहे. "ब्रिटिश सरकार हिंदुस्थान सरकारच्या तत्सम खरेदीवर कमिशन आकारीत नाहीं; तसेंच हिंदुस्थानांतील ब्रिटिश खरेदी आतां पुष्कळ वाढली आहे. व त्यामुळें हिंदी उद्योगधंद्यांस मोठा वाव मिळत आहे," असें त्या धोरणाचें समर्थन हिंदुस्थान सरकारच्या फडनवीसांनीं मध्यवर्ती असेंब्लींत केलें.

### अन्नसामुग्रीचा साठा

सध्या जर्मनीच्या नियंत्रणाखालीं असलेल्या देशांत युद्धसमाप्तीनंतर अन्नाचा तुटवडा पडेल, त्याची तरतूद करण्यासाठी अन्नसामुग्रीचा साठा करून ठेवण्याकरितां ब्रिटिश सरकारनें एक योजना आखली आहे. सर फ्रेड्रिक लीथरॉस ह्यांचेकडे हा प्रश्न सोपविला आहे.

### स्वित्सरलंड

स्वित्सरलंड हें जगांतील सर्वांत जुनें प्रजासत्ताक राष्ट्र आहे.

### फुप्फुसाचें क्षेत्रफळ

मनुष्याच्या फुप्फुसाचें एकूण क्षेत्रफळ ३९ चौरस फूट भरेल.

### चहाचें उत्पादन व खप

ब्रिटिश साम्राज्यांत जगांतील एकूण चहाच्या उत्पादनापैकी ७०% चहा तयार होतो. परंतु त्यांतील लोक एकूण जागतिक उत्पादनाच्या ७५% चहा पितात.

### चिनी टाइपरायटर

चिनी टाइपरायटरवर १० हजार अक्षरें असतात. मिनिटास १५ शब्द हा वेग तेथें अतिशय मोठा समजला जातो.

### ज्वालामुखीचा उपयोग

व्हेसुव्हियस ह्या ज्वालामुखींतून बाहेर पडणाऱ्या वाफेच्या शक्तीचा औद्योगिक उपयोग करण्याचा प्रयत्न नेपल्स येथील एक साहस करीत आहे.

### १५० शेर वजनाची मोटार

एक गॅलन पेट्रोलवर १२७ मैल व तासास कमाल २७½ मैल जाणारी मोटार एका इटालियनानें तयार केली आहे. ह्या मोटारीचें वजन १५० शेर आहे. पेट्रोल संपल्यास, पेडल्स मारून ती चालवितां येते.

### शतायु लोक

१०० वर्षांपेक्षा अधिक वयाचे रुमेनियांत १,०७४ लोक आहेत.

## अनुक्रमणिका


पृष्ठ

१ विविध माहिती ... ५९०
२ चेकच्या वसुलीसाठी फी ५९१
३ युद्धनीति ... ... ५९२
४ रस्त्यांत मोटार थांबविण्यासंबंधीं कायदा ५९२
५ स्फुट-विचार ... ५९३
जगाची आर्थिक घटना—प्रो. काळे ह्यांचीं व्याख्यानें-आर्थिक पुनर्घटना—प्रॉमिसरी नोटांवरील स्टँप ड्यूटी कमी झाली—दुकानांतील कामाच्या तासांचें नियंत्रण.
६ प्रांतिक सहकारी बँकेचें धोरण. ... ... ५९५
७ मध्यविभागांत युद्धास सहाय ... ... ५९६
८ अल्ट्राव्हायलेट किरण ५९७
९ मध्यप्रांतांतील शेतकऱ्यांच्या कर्जनिवारणाचा कायदा ... ... ५९७
१० निवडक बाजारभाव ५९९



# अर्थ

बुधवार, ता. २७ नोव्हेंबर, १९४०


## चेकच्या वसुलीसाठी फी

### मुंबई येथील बँकर्स क्लिअरिंग हाउसचा निर्णय

कलकत्ता, मुंबई, मद्रास, रंगून कोलंबो आणि कराची ह्या प्रत्येक ठिकाणीं बँकर्स क्लिअरिंग हाउस असून विशेषतः मुंबई आणि कलकत्ता येथील क्लिअरिंग हाउस महत्त्वाचें आहे आणि त्यांत चेक्सची देवघेवहि मोठ्या प्रमाणावर होते. मुंबई येथील क्लिअरिंग हाउसमध्यें प्रत्येक आठवड्यास सुमारें दहा-बारा कोटि रुपयांच्या नव्वद-पंचाणव हजार चेक्सची उलाढाल होते. हिंदुस्थानांतील प्रमुख क्लिअरिंग हाउसेसचे सभासद म्हणजे तेथील इंपीरिअल बँक, रिझर्व्ह बँक, एक्सचेंज बँका, इंग्लिश बँकिंग एजन्सी फर्म्स व कांहीं प्रमुख हिंदी जॉइंट स्टॉक बँका, ह्या संस्था होत. कोणत्याहि बँकेस बँकिंग क्लिअरिंग हाउसचे सभासद व्हावयाचें असल्यास त्यासाठी अर्ज करावा लागतो व हाउसच्या विद्यमान सभासदांचे मतानुसार त्याचा निकाल लागतो. पुण्यासारख्या ठिकाणीं बँकांचे कारकून अगर शिपाई प्रत्यहीं दुसऱ्या बँकांकडे जाऊन आपल्या त्या बँकांवरील चेक्सची वसुली करतात. असें करण्याऐवजीं सर्व बँकांचे प्रतिनिधी एके ठिकाणीं जमले व त्यांनीं परस्परांवरील चेक्सच्या रकमांची वजावाट करून बाकी देण्याचा हिशेब पुरा केला, तर तें सोईचें पडतें. बँकांची संख्या व त्यांचे एकमेकांवरील चेक हीं जितकीं अधिक असतील, त्या मानानें अशा मध्यवर्ती संस्थेची उपयुक्तता अधिक ठरेल, हें उघड आहे. अशा मध्यवर्ती संस्थेचें काम कलकत्ता, मुंबई, मद्रास आणि रंगून येथें रिझर्व्ह बँक व कोलंबो आणि कराची येथें इंपीरिअल बँक करते. ह्या 'सेटलिंग' बँकेंत सभासद बँकांचे प्रतिनिधी दररोज ठराविक वेळीं जमतात आणि एकूण देणीं व येणीं ह्यांची वजावाट करतात. ज्या बँकांची देणें रकम येणें रकमेपेक्षा अधिक असेल, त्या ती रकम 'सेटलिंग' बँकेस देऊन टाकतात; व 'सेटलिंग' बँक ज्या बँकांचें येणें अधिक असेल, त्यांस ती देते. सर्व सभासद बँकांचें 'सेटलिंग' बँकेंत खातें असल्याकारणानें हा देण्या-घेण्याचा व्यवहार अतिशय सुलभ होतो.

मुंबई बँकर्स क्लिअरिंग हाउसनें १ डिसेंबर, १९४० पासून कांहीं नवीन नियम अमलांत आणण्याचें ठरविलें आहे. त्यांस अनुसरून ह्यापुढें मुंबईतील कोटामधील बिगर क्लिअरिंग बँकांवरील चेक्स, ड्राफ्ट, डिव्हिडंड वॉरंट्स व दर्शनी हुंड्या ह्यांचे मागें प्रत्येकीं दोन आणे आकार यावा लागणार आहे. कोटाबाहेरील तत्सम पत्रिकांस चार आणे आकार ठरविण्यांत आला आहे. क्लिअरिंग हाउसच्या सभासद-बँकांच्या मुंबई बाहेरील शाखांकडून वसुलीसाठी जे चेक येतील त्यांस हा नियम लागू नाहीं. मुंबई प्रांतिक सहकारी बँकेमार्फत वसुली करणाऱ्या सहकारी बँकांवरील चेक्सलाहि त्याची माफी आहे. सभासद-बँकेमार्फत उप-सभासद-बँकेनें व्यवहार केल्यास त्यासहि आकार पडणार नाहीं. आणखी असाहि नियम करण्यांत आला आहे कीं, सहा अगर त्यापेक्षा अधिक चेक एकाच गिऱ्हाइकाकडून आल्यास, सहावरील प्रत्येक चेकला प्रत्येकीं एक आणा यावा लागेल.

मुंबई बँकर्स क्लिअरिंग हाउसनें केलेली ही फीची आकारणी लहान बँकांस अतिशय जाचक होणार आहे. मुंबई शहरांतील लहान बँकांस क्लिअरिंग हाउसचें सभासदत्व खुलें नाहीं. मुंबईमधील एक शेड्यूल्ड बँक अद्याप क्लिअरिंग हाउसची सभासद नाहीं. ह्या सर्वांस एकाद्या सभासद-बँकेमार्फत आपल्या चेक्सची देण्याघेण्याची व्यवस्था करतां येईल, परंतु त्यासाठी अशा लहान बँकांस उप-सभासद बँका म्हणून मानण्यास मोठ्या बँका सहज तयार होत नाहींत. कित्येक वेळां, त्या तशा तयार झाल्या तरी त्यासाठी भारी दरानें फीची आकारणी करतात. किरकोळ व्यापाऱ्यांचे व्यवहार लहानसहान व्यापाऱ्यांचे मार्फतच चालतात व लहान, परंतु कार्यक्षम व चांगल्या बँकांस हिंदुस्थानांत भरपूर वाव आहे. हुंड्या व प्रॉमिसरी नोटा ह्यांवरील स्टँपड्यूटी कमी करून, बँकिंगच्या प्रसारास सरकारनें इकडे उत्तेजन दिलें, परंतु क्लिअरिंग बँकांनीं लहान बँकांच्या व्यवहारास आतां थोडी आडकाठी आणली आहे. आपल्या दुय्यम, उपसभासद-बँकांच्या चेकच्या वसुलीचा व्यवहार करण्यास क्लिअरिंग बँकांना थोडा खर्च आला, तरी तो त्यांस जाणवण्यासारखा नसतो. लहान बँकांस क्लिअरिंग बँकांनीं उप-सभासद म्हणून योग्य त्या अटींवर मान्य करणें आवश्यक आहे व त्याबाबत अधिक सढळ नियम घालून दिले जाणें जरूर आहे. ज्या बँकेच्या चेकवर वसुलीसाठी दोन अगर चार आणे प्रत्येक-वेळीं भुर्दंड पडणार आहे, अशा बँकेंत खातें तरी ठेवणार कोण? नवीन बँकांचे दृष्टीनें हा प्रश्न अत्यंत महत्त्वाचा आहे. सबंद हिंदुस्थानांतील बँकिंगच्या धंद्याची प्रगति घडवून आणण्यास सहायकारक होण्याची रिझर्व्ह बँकेची भूमिका आहे. तेव्हां, तिनें हा प्रश्न व्यापक दृष्टीनें विचारांत घेतला पाहिजे. क्लिअरिंग बँकांचा तो प्रश्न आहे, असें म्हणून भागणार नाहीं. सरकारनेंहि ह्या संबंधांत लहान बँकांची बाजू घेऊन, त्यांची प्रगति खुंटणार नाहीं अशी व्यवस्था केली पाहिजे. व्यापारी प्रातिनिधिक संस्थानींहि ह्या बाबतींत आपलें म्हणणें जोरानें पुढें मांडून वाद लावून घेतली पाहिजे.

# युद्धनीति

## नियम आहेत, परंतु पंच नाहींत

युद्धांत, त्यांत भाग घेणारांनीं कांहीं नियम पाळणें इष्ट असतें. ज्याप्रमाणें एखादा हुतुतूचा अगर फुटबॉलचा सामना त्याच्या नियमानुसार खेळला जातो, तद्वतच युद्धेंहि कांहीं विशिष्ट नियमांप्रमाणें व्हावीं, ह्या दृष्टीनें सर्व राष्ट्रांचे प्रयत्न चालू असतात. गेल्या शंभर वर्षांत ह्या प्रश्नाचा विचार करण्यासाठीं अनेक आंतरराष्ट्रीय परिषद्रा भरविण्यांत आल्या. सामन्यांचे नियम पाळले जातात किंवा नाहीं हें पहाण्यासाठीं पंच नेमलेले असतात, तशी व्यवस्था युद्धाच्या नियमांचे पालनाचे बाबत नाहीं, ही मोठी अडचण आहे. अगाऊ सूचना दिल्यासेरीज प्रत्यक्ष लढाईस प्रारंभ होऊं नये, असा १९०७ सालच्या हेग येथील परिषदेनें कायदा केला आहे. एका विशिष्ट तारखेस युद्धास प्रारंभ होतो अगर तें संपतें, ह्या तत्त्वावरच पुढें राष्ट्रसंघाची घटना करण्यांत आली. युद्ध पुकारण्याचे मार्ग, युद्ध तहकुबी, तह, करार, इत्यादींसंबंधीं राष्ट्रसंघानें केलेले नियम ह्या तत्त्वाला धरूनच होते. जर्मनीचें वर्तन ह्या नियमास अनुसरून कोठें झालें? जखमी झालेल्यांचे हाल होऊं नयेत, ह्याकरितां इस्पितळें व अँब्युलन्स गाड्या ह्यांच्यावर पांढऱ्या रंगावर तांबडी फुली काढण्यांत यावी, म्हणजे तीं चटकन ओळखलीं जातील, अशी व्यवस्था १८६४ च्या व १८६८ च्या जिनीव्हा येथील परिषदांनीं केली. जर्मनीनें ही शर्त पाळली आहे काय? युद्धनौका बुडविण्याचा शत्रूस अधिकार आहे, परंतु मालाच्या आगबोटींवरील खलाशी व उतारू ह्यांची सुरक्षित ठिकाणीं रवानगी झाल्याविना ती आगबोट पकडतां अगर बुडवतां येत नाहीं, असा आंतरराष्ट्रीय कायदा सांगतो. हा कायदा मोडण्यास जर्मनीनें मागेंपुढें पाहिलेलें नाहीं. युद्धांतील कैद्यास कसें वागविण्यांत यावें, ह्याविषयीं कायदा आहे. ज्याचा प्रत्यक्ष युद्धाशीं कांहीं संबंध नाहीं, अशा ठिकाणांवर बाँब टाकणें गैरवाजवी आहे. शत्रुपक्षीय राष्ट्रांतील निरुपद्रवी नागरिकांवर बाँब टाकून त्यांना शरण आणणें ह्यांत तर जर्मनीनें हातखंडा दाखविला आहे. विषारी वायूचा उपयोग जर्मनी करील, अशी भीति युद्धास प्रारंभ झाल्यापासून वाटत होती; परंतु अद्याप ह्याबाबत जर्मनीनें आंतरराष्ट्रीय कायदा मोडलेला दिसत नाहीं. इतर सर्व प्रकारचे युद्धनीतीचे कायदे मोडल्यावर हा कायदा मोडण्यास जर्मनी कचरेल, अशी शंका वाटण्याचें अर्थातच प्रयोजन नाहीं.

### आंतरराष्ट्रीय कायद्याचें स्वरूप

प्रत्यक्ष प्रसंग आला असतांना ज्या कायद्याच्या अंमलबजावणीवर देखरेख होऊं शकत नाहीं, त्या आंतरराष्ट्रीय कायद्याचें स्वरूप तरी काय आहे? शांततेच्या काळीं राष्ट्राराष्ट्रांचे संबंध कांहीं नियमांनीं नियंत्रित केले जातात व त्यांत फारशी अडचण येत नाहीं. आंतरराष्ट्रीय कायद्याची अंमलबजावणी करण्याची प्रभावी सत्ता कोणासच नसल्याकारणानें राष्ट्रांच्या दानतेवरच त्याची अंमलबजावणी अवलंबून रहाणें अपरिहार्य आहे. गेल्या महायुद्धानंतर राष्ट्रसंघाची स्थापना झाली व त्या संघानें आंतरराष्ट्रीय कायदा मोडणारास प्रत्यक्ष युद्धाचा अवलंब टाळून कोणत्या प्रकारें वठणीवर आणतां येईल, ह्याचा विचार केला व योजनाहि तयार केल्या; परंतु प्रत्यक्ष प्रसंगीं त्या अपुऱ्या पडल्या असल्याचें स्पष्ट झालें आहे.

युद्धाची पद्धति बदलत जाते त्याप्रमाणें युद्धविषयक आंतरराष्ट्रीय कायदेहि बदलत जातात. माणसकीस प्राधान्य देण्याकडे सर्वसाधारण प्रयत्न असतो. युद्ध चालवितांना शक्य तेवढें नुकसान टाळावें व आपत्ति येऊं नये, अशी खटपट असते. परंतु, सध्याच्या युद्धांत जर्मनीनें युद्धाच्या नीतिमत्तेची आपल्या कारवायांत अडचण येऊं दिलेली नाहीं. आंतरराष्ट्रीय कायद्याचें स्वरूप नेहेमींच्या कायद्यापेक्षा वेगळें असल्याकारणानें सामन्यांतील पंचाप्रमाणें शिटी वाजवून खेळाचें नियंत्रण करण्याचा अधिकार युद्धपरिस्थितींत कोणासच नसतो. नियम पाळणाराचें त्यामुळें नुकसान होतें व शिरजोराचें फावतें हें उघड आहे.

---

### मोटार हांकणाराला आपली मोटार रस्त्यांत थांबवावयाची असल्यास त्यानें काय लक्षांत ठेवावें?

मध्यरात्रीचे सुमारास एक इसम आपल्या मोटार-सायकलनें एका गांवाहून दुसऱ्या गांवास चालला होता. तो ज्या गांवाला चालला होता त्याच गांवाच्या दिशेनें जाणारी एक मोटार नादुरुस्त झाल्यामुळें रस्त्याच्या एका बाजूला उभी करण्यांत आली होती. त्या मोटारीचे दिवे विझविण्यांत आले होते. त्या मोटारींचा व सडकेचा रंग सारखाच होता. विरुद्ध दिशेनें एक मोटार येत होती. बिघडलेल्या मोटारच्या मालकानें त्या मोटारच्या ड्रायव्हरला मदतीसाठीं थांबण्याचा इषारा केला, त्याप्रमाणें त्यानें आपली मोटार बिघडलेल्या मोटारपासून सुमारें २० याडांचे अंतरावर रस्त्याचे एका बाजूनें उभी केली. त्या मोटारीचे दिवे लागलेले होते व ज्या दिशेनें मोटार-सायकलवाला येत होता त्या दिशेकडे तिचें तोंड होतें. मोटार सायकलवाला ताशीं २५ मैलांच्या वेगानें येत होता. मदतीसाठीं थांबविण्यांत आलेल्या मोटारीच्या दिव्याच्या प्रकाशामुळें त्याचे डोळे दिपून गेले; म्हणून त्यानें आपल्या मोटार सायकलीचा वेग ताशीं १५ मैलांचा केला. वेग कमी करून थोडा पुढे गेला नाहीं तोंच त्याला प्रतिवादीची (नादुरुस्त झालेली) मोटार दिसली. तिला टाळण्यासाठीं त्यानें आपल्या कडून शिकस्त केली; परंतु कांहीं उपयोग झाला नाहीं. त्या मोटारीच्या मागच्या मडगार्डवर त्याची मोटार-सायकल आदळली व त्या अपघातांत त्याला इजा झाली म्हणून त्यानें प्रतिवादीवर (दिवे बंद करून मोटार उभी ठेवणाऱ्यावर) नुकसान-भरपाईसाठीं दावा आणला होता. त्या दाव्यांत प्रिव्हि कौन्सिलकडून त्याला १२५९ पौं. ८ शि. २ पे व आणली सर्व खर्च अशी डिक्री मिळाली.

प्रिव्हि कौन्सिलच्या ह्या निकालापासून मोटार-मालकांनीं एक गोष्ट अवश्य लक्षांत ठेवावी ती ही कीं, रस्त्याचे बाजूस आपण आपली मोटार उभी ठेवली होती, असें म्हणून त्यांना आपल्यावरील नुकसान-भरपाईची जबाबदारी टाळतां येणार नाहीं. अपघात होऊं नये म्हणून जेवढी खबरदारी घेणें अवश्य होतें तेवढी आपण घेतली असें सिद्ध करण्याची जबाबदारी त्यांच्यावर राहील. खबरदारी कशा प्रकारची असावी हें प्रत्येक मुकदम्याच्या हकिकतीवरून ठरवावयाचें असतें. आपल्या मदतीसाठीं थांबविलेल्या मोटारीचे दिवे लागलेले आहेत त्या दिव्यांच्या प्रकाशामुळें विरुद्ध दिशेनें येणाऱ्याचे डोळे दिपून तो आपल्या मोटारीवर येऊन आदळण्याचा संभव आहे ही गोष्ट प्रतिवादीचे लक्षांत यावयास पाहिजे होती व अशा प्रकारचा अपघात होऊं नये, म्हणून त्यानें आपल्या मोटारीचे दिवे लावून ठेवणें हें त्याचें कर्तव्य होतें. त्यानें आपल्या कर्तव्यांत चूक केल्यामुळें त्याच्यावर निष्काळजीपणाचा आरोप आला व नुकसान भरपाईच्या रकमेचा जबर भुर्दंड त्यास सहन करावा लागला. "न्यायबोध" वरून.

# स्फुट विचार

## जगाची आर्थिक घटना—प्रो. काळे ह्यांचीं व्याख्यानें

हैद्राबादच्या ओस्मानिया युनिव्हर्सिटीच्या विद्यमानें प्रो. काळे ह्यांनीं त्या संस्थेच्या निमंत्रणावरून गेल्या आठवड्यांत दोन व्याख्यानें दिलीं. जगाची आर्थिक घटना हा त्यांचा विषय होता. सध्या चालू असलेल्या युद्धामुळें जगांतील राष्ट्रांचे परस्परांशीं असलेले व्यापारी व औद्योगिक संबंध बदलले आहेत आणि बदलत आहेत. युद्धाच्या निकडीमुळें उद्योगधंद्यांचें स्थलांतर झपाट्यानें होत आहे आणि ह्या अदलाबदलीचा दीर्घगामी परिणाम झाल्यावाचून रहाणार नाहीं. त्याचप्रमाणें जर्मनी, इटली व जपान ह्यांच्या त्रिकुटानें आपण जगाची घडी नवीन तऱ्हेनें बसवणार असल्याची घोषणा केली आहे. ही पुनर्घटना कशा प्रकारची होणार ह्याची कल्पना हिटलरशाहीच्या युरोपांतील गेल्या दोन वर्षांतील कारवायांवरून सहज येण्यासारखी आहे. सर्व राष्ट्रांवर आपल्या वर्चस्वाचें राजकीय जूं लादावयाचें आणि त्याचा आर्थिक फायदा स्वतःस करून घ्यावयाचा हा डाव जर्मनी आज खेळत असून इटलीनें हिटलरच्या पावलांवर पाऊल टाकण्याचें ठरवलें आहे. हा जुलमी पुनर्घटनेचा प्रयत्न हाणून पाडावयाचा ही पहिली व महत्त्वाची गोष्ट स्वातंत्र्यप्रिय राष्ट्रांस घडवून आणावयाची आहे. जगाची आर्थिक घटना आज कोणत्या प्रकारची आहे आणि ती युद्धाचे अखेर कोणत्या स्वरूपाची होणें अगत्याचें आहे ह्याचा विचार करणें महत्त्वाचें असून त्या प्रश्नाची चर्चा प्रो. काळे ह्यांनीं ओस्मानिया युनिव्हर्सिटींतील आपल्या दोन व्याख्यानांत केली. गेल्या महायुद्धानंतर राष्ट्रांचे परस्परसंबंध राजकीय आणि आर्थिक क्षेत्रांत कसे होते, त्यांचेमध्यें चालू युद्धानें काय फेरफार घडवून आणले आहेत आणि त्यांची युद्धोत्तर व्यवस्था कशी असावी ह्यांचें विवेचन करून पुनर्घटनेंत हिंदुस्थान देशास कोणतें स्थान मिळालें पाहिजे हें त्यांनीं दिग्दर्शित केलें.

## आर्थिक पुनर्घटना

परस्परावलंबन आणि परस्पर-सहकार्य हे आधुनिक प्रगतीचे विशेष आहेत असें समजण्यांत येतें. भौतिक सुधारणांचे योगानें राष्ट्रें व समाज एकमेकांकडे जोरानें खेचले जात असून परस्परांच्या गरजा समाधानकारक रीतीनें भागवून लोक आपापल्या सुखांत भर घालीत आहेत. व्यापाराच्या सहायानें मालाची देवघेव करून राष्ट्रें अधिकांत अधिक असा आपला फायदा होण्याची तजवीज करीत आहेत. गेल्या महायुद्धाचे अखेर जगांतील राष्ट्रांची पुनर्घटना झाली, तिचे मुळें त्यांच्या परस्पर-संबंधांत महत्त्वाचे बदल झाले. जर्मनी सारख्या देशाच्या जुलमास लहान सहान राष्ट्रांच्या स्वातंत्र्याचा बळी घेतां येऊं नये म्हणून राष्ट्रसंघाची स्थापना करण्यांत आली. पण राष्ट्रस्वातंत्र्याचें रक्षण त्या संस्थेच्या हातून होऊं शकलें नाहीं आणि जर्मनींत नाझी पक्षानें सूड घेण्याचा चंग बांधला. ह्यासाठीं त्यानें तयारी चालवली आणि भावी युद्धाची सिद्धता आरंभली. व्यापार व उद्योगधंदे ह्यांस स्वयंपूर्णतेच्या तत्त्वावर आकुंचित स्वरूप देण्यांत आलें. मागील महायुद्धानंतर स्वतःच्या उद्योगधंद्यांस उत्तेजन देण्याचें धोरण सर्वच राष्ट्रांनीं अंगिकारलें होतें. खुद्द ग्रेट ब्रिटनलाहि अनियंत्रित व्यापाराच्या तत्त्वावर विसंबून रहाणें सुरक्षित वाटलें नाहीं आणि हिंदुस्थानांत औद्योगिक संरक्षणाची कास येथील सरकारास धरावी लागली. ह्या परिस्थितींत उद्योगधंदे आणि व्यापार ह्यांची वांटणी जगांतील देशांत नवीन तऱ्हेनें होणें अपरिहार्य झालें. आर्थिक मंदीचा फायदा घेऊन जर्मनीनें शेजारच्या कृषिप्रधान राष्ट्रांवर त्यांस प्रतिकूल असे व्यापारी करार लादले. त्यांचें वर्णन करून प्रो. काळे ह्यांनीं प्रस्तुत युद्धाचे प्रारंभींच्या जगाच्या आर्थिक घडीचें चित्र रेखाटलें. युद्धाच्या गरजा भागवण्यासाठीं हिंदुस्थानांतहि नवीन कारखाने स्थापले जात आहेत, त्यांचा योगक्षेम युद्धोत्तर चांगला चालेल अशी व्यवस्था होणें आवश्यक आहे. ह्या पुनर्घटनेंत पूर्व व पश्चिम ह्या दोन्ही बाजूंच्या राष्ट्रांस संपत्तीच्या उत्पादनांत व वाटणींत न्याय्य हिस्सा मिळेल अशी तरतूद अवश्य झाली पाहिजे. राष्ट्रांच्या आर्थिक मागसलेपणाचा फायदा कोणत्याहि बलाढ्य देशास किंवा देशांच्या गटास घेतां येतां कामा नये. आशिया खंडांत आतां आर्थिक जागृति झाली आहे आणि इकडील देशांचें आधुनीकरण झपाट्यानें चालू आहे. जर्मनीची जगाच्या वर्चस्वाची योजना हाणून पाडण्याचें महत्त्व ह्या प्रकारच्या न्याय्य व योग्य पुनर्घटनेमध्यें आहे.

## प्रॉमिसरी नोटांवरील स्टँपड्यूटी कमी झाली

दुसऱ्याकडून विशिष्ट मुदतीनंतर मिळावयाच्या पैशावरचा हक्क दर्शविणारी 'मुदती हुंडी' ही अत्यंत सोइस्कर पतपत्रिका आहे. एका व्यापाऱ्यानें दुसऱ्या व्यापाऱ्यावर हुंडी काढली असतां, तिची मुदत भरण्यापूर्वींच तो ती हुंडी बँकेकडून डिस्कौंट करून घेऊ शकतो. अशा रीतीनें त्यास हुंडीचे कांहीं मुदतीनंतर मिळावयाचे पैसे आजच उभे करतां येतात. अशा मुदती हुंड्यांचा हिंदी व्यापारी व्यवहारांत फैलाव झाला तर हिंदी बँकिंगच्या उत्कर्षास चांगलें सहाय होईल, असा अभिप्राय बँकिंग चौकशी कमिट्यांनीं मागेंच व्यक्त केला होता व त्यांचेवरील स्टँप ड्यूटी कमी करावी अशीहि त्यांनीं शिफारस केली होती. व्यापारी लोक हुंड्यांप्रमाणें प्रॉमिसरी नोटींचाहि पैसा उभा करण्याकडे उपयोग करतात. बाराशे रुपये किंवा त्यापेक्षा कमी इतक्या रकमेच्या एक वर्षाच्या आंतील मुदतीच्या हुंडीवर पूर्वीं दर दोनशे रुपयांस तीन आणे इतकी ड्यूटी पडत असे, ती गेल्या जानेवारींत सरकारनें कमी केली व दर हजार रुपये किंवा कमी इतक्या रकमेच्या हुंडीवर दोन आणे स्टँप ड्यूटी, अशी आकारणी ठरवली. स्टँप ड्यूटीचा कायदा हिंदुस्थान सरकारच्या कक्षेंत असला तरी प्रांतिक सरकारनें ह्या सुधारणेस संमति दिली. हुंड्यांवरील ड्यूटी कमी करतेवेळीं प्रॉमिसरी नोटींवरील ड्यूटी कमी करण्याचें राहून गेलें. ह्या चुकीची दुरुस्ती आतां करण्यांत आली आहे. ह्या दोन प्रकारच्या पतपत्रिकांवरील करांत तफावत न ठेवण्याचें सरकारचें धोरण आहे, त्यास अनुसरून व झालेल्या तफावतीमुळें व्यापारीवर्गाची होत असलेली गैरसोय लक्षांत घेऊन सरकारनें आतां एक जाहीरनामा काढून प्रॉमिसरी नोटांवरील ड्यूटी कमी केली असल्याचें प्रसिद्ध केलें आहे. ह्या दुरुस्तीची अंमलबजावणी गेल्या जानेवारींतील हुंड्यांबाबतच्या जाहीरनाम्याचे तारखेपासून सुरू झाली असें समजण्यांत यावयाचें आहे.

## दुकानांतील कामाच्या तासांचें नियंत्रण

बॉंबे शॉप्स अँड एस्टॅब्लिशमेंट्स ॲक्टची अंमलबजावणी आतां सुरू झाली असून, दुकानें व कचेऱ्या ह्यांतील कामाच्या तासांच्या नियंत्रणाचा प्रत्यक्ष अनुभव येऊं लागला आहे. नोकरवर्गास ह्या कायद्यान्वयें साप्ताहिक सुट्टी मिळावयाची असून त्यांचे रोजचे कामाचे तासहि नियमित व्हावयाचे आहेत व त्यांच्या विश्रांतीच्या वेळा निश्चित व्हावयाच्या आहेत. ह्या कायद्याचे संबंधांत मालक वर्गाचें म्हणणें काय आहे, हें इंडियन मर्चंटस चेंबरनें त्याविषयीं सरकारास आपलें म्हणणें लिहून पाठविलें,त्यावरून समजून येईल. शांततेच्या काळांत प्रस्तुत कायद्याचें स्वरूप ठरविण्यांत आलें, परंतु युद्धामुळें आतां परिस्थिति पालटली आहे व त्यामुळें कामाच्या तासांचें नियंत्रण जाचक होईल असें चेंबरनें सरकारास कळविलें होतें. व्यापाऱ्यांचे दुकानांत नोकरांनीं किती तास काम करावयाचें हें कायद्यानें निश्चित केलेलें आहे. ह्या तासांत आणखी मासिक ६० तासांच्या वाढीस मान्यता मिळावी, अशी चेंबरची सूचना आहे. ह्या जादा कामास निराळें वेतन द्यावयास लागावें, हें उघड आहे. मालमोजणी वगैरेसाठी जादा तासांच्या कामाची सवलत इतरांस दिली आहे, ती हिशेब पुरे करण्यासाठी बँका, वगैरेस मिळावी, असेंहि चेंबरनें सुचविलें आहे. कायद्याप्रमाणें रजिस्टरें बाळगणें, नोटिसा लावणें इत्यादि गोष्टी लहान दुकानदारांस जाचक होतील इकडेहि चेंबरनें सरकारचें लक्ष वेधलें आहे. कायद्याच्या अंमलबजावणीचा पुरेसा अनुभव आल्यानंतर, त्यांत पुढें आवश्यक त्या सुधारणा कराव्या लागतील, हें उघड आहे.

---

## पोलादाचें हिंदुस्थानांत उत्पादन

- "पोलादाचें उत्पादन करण्याची कला ख्रिस्तापूर्वी किमान एक हजार वर्षें हिंदुस्थानांत अवगत होती, परंतु सध्याच्या काळांत तें प्रथम यशस्वी रीतीनें करण्याचा मान टाटा आयर्न अँड स्टील कंपनीकडे जातो. दरसाल १ लक्ष २० हजार टन पिग आयर्न व ७० हजार टन पोलाद करण्याचा कंपनीचा पहिला कार्यक्रम होता. तिनें गेल्या वर्षी ११ लक्ष, ४० हजार टन पिग आयर्नचें व ७ लक्ष, ७० हजार टन पोलादाचें उत्पादन केलें. कंपनीच्या उत्पादनांत ह्यापुढे आणखी वाढ होणार आहे. स्टील कॉर्पोरेशन ऑफ बेंगॉलनें गेल्या वर्षी पोलादाच्या उत्पादनास प्रारंभ केला. त्या कारखान्याची उत्पादनशक्ति दरसाल २ लक्ष ते २½ लक्ष टन इतकी आहे. ह्या दोन कंपन्यांत मिळून हिंदुस्थानास लागणारें सर्व पोलाद तयार होईल व कांहीं निर्गतीसाठींहि शिलक राहील. लवकरच इंजनाचे सर्व भाग जमशेदपूर येथें होऊं लागतील. जमशेदपूर शहराची लोकसंख्या १ लक्षावर असून टाटा कंपनींत सुमारें २० हजार कामगार कामावर आहेत. त्यांस दरमहा १५ लक्ष रुपये वेतन मिळतें. टाटा कंपनी रेल्वेस दरसाल २½ कोटि रुपये वाहतुकीसाठी देते व हिंदुस्थान सरकारास २ कोटि रुपये कर भरते. टाटा कंपनीनें कामगारांच्या शिक्षणाची, आरोग्याची वगैरे चांगली सोय केली आहे.":—सर अर्देशिर दलाल ह्यांचें मुंबई रोटरी क्लबापुढील व्याख्यान.

---

## डिफेन्स बॉंडस कर्जरोखे

१६ नोव्हेंबर अखेर २८ कोटि, ६७ लक्ष रुपयांचे ३% डिफेन्स बॉंडस खपले आहेत. लोकांनीं २ कोटि, १९ लक्ष रुपयांचे; बिनव्याजी रोखे घेतले आहेत.

## शिवणकलेच्या शिक्षणास कारखान्याची मदत पाहिजे.

( ले. डब्ल्यु. आर. पराडकर लंडन, डिप्लोमॅटिस्ट व प्रो. टेलर्स कटिंग ॲकॅडिमी. )

सध्या लढाईमुळें प्रत्येक तऱ्हेच्या नवीन मालाची गरज भासूं लागल्यामुळें नवीन धंदे वाढीस लागत आहेत. शिवणकामाच्याही धंद्याचे असेंच आहे. शिवणकाम करणारांस कितीतरी नवीन नवीन प्रकारचे कपडे करावे लागत आहेत; हीं नवीन कामें उरकण्याकरतां कॉन्ट्रॅक्टर्सना जादा कामें मिळत आहेत. सरकारही कारखाने काढीत आहे, तेव्हां ज्याप्रमाणें येथील ससून हॉस्पिटलची शिक्षणसंस्था प्रत्यक्ष व्यावहारिक ज्ञान देण्यासाठीं हॉस्पिटलाच जोडलेली आहे, किंवा इंजिनियरिंग कॉलेजचें वर्कशॉप असतें, त्याप्रमाणें नवीन निघत असलेल्या सरकारी टेलरिंग फॅक्टरीजमध्यें टेलरिंगच्या शिक्षणाची योजना करावी किंवा सध्यांच्या अस्तित्वांत असलेल्या शिवणकामाच्या शिक्षणसंस्था त्यामध्यें सामील कराव्यात. शिक्षणक्रम २ वर्षांचा असावा. पहिल्या वर्षी शास्त्रीय ज्ञान व दुसऱ्या वर्षी त्याचेच प्रात्यक्षिक अनुभव, प्रॅक्टीस, नंतर नोकरीस लायक ठरविणें वगैरे.

जर ह्या शिक्षणसंस्था सरकारी कारखान्यास जोडतां आल्या नाहींत तर अशा संस्थेंतील सर्टिफाईड विद्यार्थ्यांना तेथें प्रवेश मिळेल असें जाहीर करावें म्हणजे तेथें त्यास जादा प्रॅक्टीस व नवीन उपस्थित होणारीं कामें म्हणजे मिलिटरी ड्रेसेस, निरनिराळ्या ऑफिसरांचे, बोटीवरच्या लोकांचे व वैमानिकांचे इ. इ. हजारो कपडे करण्यास संधि मिळेल; त्यांना पूर्ण वाकबगार होतां येईल, त्यांच्या पुढील बेकारीचा प्रश्न सुटेल; सध्या शिक्षण घेणारांची संख्या घटत आहे ती वाढेल, देशी, परदेशी अनुभविक तज्ञांच्या हाताखालीं राहून कामें करतां येतील, शिक्षण पूर्ण वाढल्यावर तेथेंच नोकरी मिळूं शकेल किंवा स्वतंत्र प्रॅक्टीस करतां येईल. अल्प भांडवलवाल्या खासगी धंदेशिक्षण संस्थांमध्यें तयार झालेले विद्यार्थी प्रथम त्यांचीच नक्कल करून प्रतिस्पर्धी होतात तसें सरकारी कारखान्यांत होणार नाहीं, तेथें उच्च प्रात्यक्षिक शिक्षण देण्याची सोय झाली तरच शिवणकलेची उन्नति होईल. लढाईनंतर सुद्धां असा एक विभाग कायम ठेवण्यास सरकारला हरकत नाहीं कारण नेहमीं इतरांस जीं कॉन्ट्रॅक्टस देण्यांत येतात तीं जरा कमी करतां येतील.

सरकारला जर यांत काम उरकण्याच्या दृष्टीनें अडचण वाटली तर त्यांनीं खासगी शिक्षण—संस्थांना त्यांपैकी कांहीं कामें पुरविण्याची व्यवस्था करावी म्हणजे विद्यार्थ्यांस शास्त्रीय ज्ञानाबरोबरच नेहमींच्या जोडीला नवीन नमुन्यांचें शिक्षण व भरपूर प्रॅक्टीस मिळेल व धंदे—शिक्षणास मदत करतां येईल; केवळ विद्यार्थी पुरवून मदत करणें सरकारला खर्चांत टाकील व विद्यार्थ्यांचा प्राथमिक १ वर्षाचा कोर्स पुरा झाल्यावर पुढें काय हा प्रश्न येईल, तो येथें सुटेल, लायकीप्रमाणें नोकरी मिळेल, शिवाय गिऱ्हाइकी चालू फॅशन्सचा अनुभव मिळेल, नंतर वाटल्यास स्वतंत्र दुकानदार होतां येईल.

शिक्षण—संस्थांस कायमचें काम पुरविणें म्हणजे सरकारास खर्च नसून उलट आपलें काम करून मिळण्याची हक्काची सोय आहे अशा कामाच्या ठिकाणी जर विद्यार्थ्यांना प्रॅक्टीस मिळेल तर त्यांचा कायमचा फायदा होईल. विद्यार्थ्यांना सेवक व्हावी म्हणून नेहमींची अल्पमुदतीची ऑर्डरची कामें त्यांच्याकडून वेळेवर व बरोबर करून घेण्यांत जास्त दगदग असते व मोजक्याच विद्यार्थ्यांची सोय होते. खासगी शिक्षण—संस्थेंत अशीं कामें करून घेतल्यास सरकारची सोय होऊन विद्यार्थ्यांचाही फायदा होईल तेव्हां सरकारनें हें काम हातीं घेणें फायदेशीर आहे.

# प्रांतिक सहकारी बँकेचें धोरण

( मुंबई प्रांतिक सहकारी बँकेच्या लासलगांव येथील उपशाखेच्या उद्घाटन समयीं बँकेचे अध्यक्ष, श्री. आर. जी. सरय्या यांनीं केलेलें भाषण. )

"सहकारी चळवळ ही सर्वांची आहे. लहान, थोर, गरीब, श्रीमंत, शेतकरी, व्यापारी, व नोकरवर्ग, हिंदू, मुसलमान, ख्रिश्चन व इतर धर्म व सर्व जाती ह्यांचा ह्या चळवळींत समावेश होतो व आपआपल्या परीनें सर्वांना त्यापासून फायदा करून घेतां येतो. मुंबई प्रॉव्हिन्शिअल को-ऑपरेटिव्ह बँक लि. ही संस्था सर्व सहकारी मंडळीकरतां पैशाची सोय करण्याकरितां स्थापलेली आहे व त्यामुळें तिचें धोरण, व्यवहाराला धरून गिऱ्हाईकांना जितकी सवलत व फायदा करून देतां येत असेल तेव्हां देणें असें असणार व आहे ही, म्हणून गिऱ्हाइकांची सोय अगर चाकरी करणें हेंच तिचें ध्येय आहे. व त्यास अनुसरूनच लासलगांव येथें एक बँकेची उपशाखा उघडावी असें योजिलें आहे; व त्यांस पुढील-प्रमाणें विशेष गोष्टी कारणीभूत झाल्या आहेत.

"व्यापारी बँका (जॉईंट स्टॉकबँका) आपल्या इलाख्यांत पुष्कळ आहेत. त्या सर्वसाधारणपणें थोड्या मुदतीनें कर्जाऊ रकमा देतात व तेंही बहुधा मोठ्या प्रमाणावर असेल तरच त्याचा विचार करतात. कारण त्यांच्या खर्चाच्या दृष्टीनें लहान प्रमाणावर धंदा करणें परवडत नाहीं. शेतकरी लोक बरेच अंशीं पावसावर अवलंबून असतात, त्यांचें उत्पन्नही वर्षांत एकदांच येऊं शकतें; व त्यांच्या गरजाही लहान प्रमाणावर असतात. त्यांनीं काढलेलें कर्ज तें थोड्या मुदतींत फेडूं शकत नाहींत. त्यांना निदान वर्ष-दोन वर्षें तरी लागतात. ह्यामुळें व्यापारी बँका, शेतकऱ्यांची गरज भागवूं शकत नाहींत. ह्यामुळें स्वतंत्र निराळ्या प्रकारच्या बँकेची ह्याकरितां जरूरी आहे व अशा प्रकारची आमची बँक आहे. ती शेतकऱ्यांची बँक आहे म्हणून शेतकऱ्यांचें हित ज्या ज्या योगें साधेल तें तें करण्यास ती तयार आहे. शेतकऱ्यांना जें कर्ज लागतें तें जसजसें लागेल तसतसें देणें जरूर असतें, त्याचप्रमाणें त्यांच्या कडील वसूल त्यांच्या हातांत ज्या ज्या वेळीं पैसा येईल, तेव्हां लगेच केला पाहिजे; नाहींतर सदरहू कर्ज व झालेलें उत्पन्न अनाठायीं खर्च होण्याचा संभव असतो. ह्या दृष्टीनें बँक अगर सावकार जितका शेतकऱ्याजवळ असेल तितका बरा म्हणून बँकेची उपशाखा येथें काढण्याचें ठरविलें आहे.

"वरील विवेचनावरून ही बँक शेतकऱ्यांकरितां आहे हें खरें, परंतु ती कोणाची आहे? ती एकादा बडा भांडवलवाला पण उपकारी इसम अगर इसमांनीं काढलेली कंपनी आहे व अन्न-छत्राप्रमाणें शेतकऱ्यांस मदत व्हावी ह्या दृष्टीनें ती उभारलेली आहे? नाहीं, तसें नाहीं. सदरहू बँक ही भागीदारांची आहे व त्यांपैकीं २००५ भागीदार सहकारी संस्था आहेत व त्यांनीं एकंदर भांडवलापैकीं शेंकडा ५२ टक्के भांडवल घातलें आहे. पंच मंडळीमध्यें सहकारी संस्थांच्या प्रतिनिधींचें बहुमत आहे. हे प्रतिनिधी त्यामुळें शेतकरी लोकांनीं अप्रत्यक्ष रीतीनें निवडलेले आहेत. बँकेमध्यें असलेल्या ठेवी पहातांही असें दिसून येईल कीं, शेंकडा ५१ टक्के ठेवी सहकारी संस्थांनीं ठेविलेल्या आहेत. सहकारी संस्था ह्या शहरीं लोक, नोकरवर्ग व शेतकरी ह्यांच्या आहेत. सहकारी संस्थांस इतर लोकांपेक्षां ठेवीवर जास्त व्याजाचा दर देण्यांत येतो. म्युनिसिपालिट्या, लोकलबोर्ड, ग्रामपंचायती, ह्यांचा पैसा शेतकऱ्यांकडूनच येतो व ह्या दृष्टीनें अप्रत्यक्ष रीतीनें शेतकरीच ह्या ठेवीचे मालक होत. ह्या बँकेंत असाही नियम आहे कीं, ५ टक्केच्या वर नफा वाटावयाचा झाला तर तो कर्ज घेणाऱ्या सहकारी संस्था व भागीदार ह्यांमध्यें सारखा वाटला पाहिजे. ह्या सर्व गोष्टीवरून ह्या बँकेचा खरा मालक कोण हें आपल्या ध्यानीं येईलच. तो शेतकरी आहे म्हणजे ही बँक आपली होय व तिचें भवितव्य आपल्या हातांत आहे.

"आपणां सर्वांना स्वराज्य पाहिजे असें ज्यावेळीं आपण म्हणतों त्यावेळीं स्वैर वर्तनाची मोकळीक पाहिजे असा त्याचा अर्थ नव्हे. लोकसत्ताक संस्था पाहिजेत ह्याचा अर्थ बिनसत्ताक संस्था व्हाव्या असें कोणीही म्हणणार नाहीं. कल्पतरू आपणांजवळ असावा असें प्रत्येक मनुष्याला वाटतें पण तो टिकवणें व त्याचा नाश होईल असें कोणी करीत असेल त्यांस विरोध करणें हें प्रत्येकाचें कर्तव्य होय. हें जर खरें, तर प्रत्येक शेतकऱ्यानें आपली ही बँक कशी टिकेल, कशी वाढेल, व तिचा आपणांस जास्त उपयोग करून घेतां येईल ह्याकडे लक्ष दिलें पाहिजे. ह्याकरितां माझ्या मतें, प्रत्येक शेतकऱ्यानें आपली शेती जास्त उत्पन्न कसें देईल तें पाहिलें पाहिजे. त्याकरितां जरूर तर कर्ज घ्यावें व अशा कारणांकरितां कर्ज काढणें अयोग्य नव्हे. मानव-धर्माप्रमाणें कोणतीही वस्तू अनधिकारानें संपादन करण्यास आपण व्यवहारांत चोरी हें नांव देतों व हें पाप होय. तसेंच कर्ज काढून तें स्वतः होऊन परत न करणें हेंही त्याच सदरांत घालतां येईल. पण आनंदाची गोष्ट ही आहे कीं, शेतकऱ्यां-मध्यें ही दिवाळखोरी अजून शिरलेली नाहीं, इतकेंच नव्हे तर वडिलांचें कर्ज, वडिलांची मिळकत न मिळाली असली तरी सुद्धां, तें फेडणें हें आपलें आद्य कर्तव्य आहे असें मुलगा समजत आहे. परंतु इच्छा असूनहि कर्तव्यांतून पार पडतां येत नाहीं अशी स्थिति होते. ती टाळण्यास शेतकऱ्यानें असें लक्षांत ठेविलें पाहिजे कीं, शक्यतोंवर कर्ज न काढणें, कर्ज काढणें झालें तर तें उत्पादक कारणांकरितांच काढणें, परत-फेडीच्या शक्तीच्या आंत काढणें व झालेल्या उत्पन्नांतून पहिल्या-नदां भांडवल परत करून नफ्यांतूनच संसार भागविणें इष्ट होय. ज्याप्रमाणें शेतींत खतांचा उपयोग आपण योग्य प्रमाणांत केल्यास शेती फोफावते, व जास्त केल्यास ती जळून जाते. तसेंच कर्जाचा उपयोग आपली आर्थिक स्थिति सुधारण्याकरितां केला पाहिजे. बोजा डोईजड होऊन आपण धुळीस मिळण्याकडे त्याचा परिणाम होतां कामा नये. कदाचित् कांहीं लोकांचा फायदा कर्ज बुडविण्यांत व तें फेडण्याचें लांबणीवर टाकण्यांत होईल, परंतु त्यामुळें सहकारी पेढ्या व बँका ह्यांचें नुकसान होऊन त्या डबघाईस येतील. परंतु ह्या संस्था म्हणजे कोणी परकी मंडळ्या नसून शेतकऱ्यांचे संघ आहेत म्हणून इतर शेतकरी बंधूंना त्याची बाधा पोहोंचेल व त्यामुळें त्यांचेंही सदैवाचें नुकसान होईल करितां प्रत्येक शेतकरी बंधूंनीं आपलें कर्ज एकनिष्ठतेनें फेडण्याबद्दल निश्चय केला पाहिजे व तसें त्यानें करण्याकरितां इतर शेतकरी बंधूंनीं त्याच्या मनावर बिंबवलें पाहिजे."

## मध्यविभागांत युद्धास सहाय

मुंबई प्रांतांतील मध्यविभागांतील अहमदनगर, खानदेश, पुणें व सातारा ह्या जिल्ह्यांत युद्धफंडासाठी ऑक्टोबरअखेर किती पैसे जमले, ह्याची तपशीलवार माहिती खाली दिली आहे.

| | युद्धदेणगी फंड | रेडक्रॉस इ. फंड | सिल्व्हर ट्रिंकेट फंड | डिफेन्स सेव्हिंग्ज सर्टिफिकेट | ३% व्याजाचे युद्ध कर्जरोखे | बिनव्याजाचे रोखे | व्यापाऱ्यांचा युद्ध-फंड |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | रु. | रु. | रु. | रु. | रु. | रु. | रु. |
| अहमदनगर | ४४,५९९ | ८,४७४ | ४०९ | ४१,४५० | २५,९०० | ४,३०० | ... |
| पूर्व खानदेश | ४०,०८८ | १४,२०८ | ५५९ | २८,०८० | १,७३,६०० | ३,५०० | ३५४ |
| पश्चिम खानदेश | २५,६३८ | ७,३५६ | ५०० | ३०,९७० | २,३६,००० | ८,३७५ | १,१[illegible]६ |
| पुणें | ९४,९५९ | १०,८६३ | ... | २,७७,०६० | ७,८९,००० | १,९२,६२९ | ... |
| सातारा | ४५,९८८ | ७,१२१ | १,६०० | १,१२,९२० | १९,८६१ | २०० | ६,४१३ |

### टाटा मिल्स लि.


टाटा मिल्स लि. च्या डिबेंचर होल्डर्सची साधारण सभा गेल्या शुक्रवारी भरली होती. ३१ डिसेंबर, १९४० रोजीं ज्या डिबेंचरांची रकम परत करण्यांत यावयास पाहिजे होती, त्यांची परतफेडीची मुदत एक वर्षानें वाढविण्यांत यावी, असें तीमध्यें ठरलें.

### युद्धधोक्याच्या विम्याचा हप्ता वाढला

युद्धाच्या धोक्याच्या विम्याचा हप्ता ग्रेटब्रिटनमध्यें दरमहा दरशेंकडा ५ शिलिंग होता, तो आतां ७ शिलिंग ६ पेन्स करण्यांत आला आहे. ह्या दराचा प्रत्येक तिमाहीस फेरविचार करण्यांत येतो.


# फॅन्सी रिस्ट वॉचेस

फुकट फुकट फुकट




१९४० चें मॉडेल ऑटोमॅटिक रिव्हॉल्व्हर

लायसेन्सची जरूर नाहीं

STEVENS CO. CROMWELL CONN U.S.A.

रिव्हॉल्व्हरचा आकार वरील चित्रांत दाखविल्याप्रमाणें आहे. खऱ्याखुऱ्या रिव्हॉल्व्हरप्रमाणें दिसण्यांत असून ह्याचा मोठा आवाज होतो. ह्याचें वजन १५ औंस आणि लांबी ७ इंच आहे. नळीमध्यें ६ काडतुसें राहतात आणि तीं एकामागून एक उडवतां येतात. ह्याच्या मोठ्या आवाजानें जंगली श्वापदेंहि घाबरून पळतात आणि चोर व शत्रू ह्यांपासून रक्षणास तो उपयोगी आहे. ७७७ नंबरच्या रिव्हॉल्व्हरची किंमत ४ रु. ८ आणे आहे आणि त्याच्या बरोबर ३५ काडतुसें असतात. नं. ८८८ चें रिव्हॉल्व्हर उत्तम पोलादाचें असून त्याची किंमत ५ रु. ११ आणे आहे. त्याच्याबरोबर ७५ काडतुसें येतात. जादा १,००० काडतुसांची किंमत ३ रु. पेटीसह पेटीची किंमत १ रु. १२ आणे. रिव्हॉल्व्हरसाठी तेल किं. १२ आणे. टपाल हशील वेगळें.

फुकट—प्रत्येक रिव्हॉल्व्हर बरोबर दोन फॅन्सी रिस्ट वॉचेस फुकट बक्षिस दिलीं जातात. तीन रिव्हॉल्व्हर एकदम घेणारास सहा घड्याळें बक्षिस आणि टपाल हशील माफ.

पत्ता:—अमेरिकन पिस्तुल कंपनी
पोस्ट बॉक्स नं. २७ (A. P.) अमृतसर (India.)

### अल्ट्रा व्हायोलेट किरणांचा बँकांच्या व्यवहारांत उपयोग

अल्ट्रा-व्हायोलेट किरण अदृश्य असून त्याचा झोत पदार्थावर पाडला असतां ते पदार्थ कमीअधिक प्रमाणांत प्रकाशमान होतात. बँक नोटा, बँकांची पत-पत्रें, चेक व रोखे ह्यांचा खरेपणा ठरविण्यास अल्ट्रा-व्हायोलेट किरणांचा अचुक उपयोग होतो.

चेक किंवा नोटेवरील शाईनें लिहिलेला कांहीं मजकूर खोडून दिसेनासा केलेला असला आणि ही गोष्ट साध्या डोळ्यांना दिसत नसली तरी अल्ट्रा-व्हायोलेट किरणांच्या प्रकाशांत खोडलेल्या जागीं किरणांची तेजस्विता कमी होते व बनावटपणा उघडकीस येतो. पुष्कळ वेळां मूळ आकडे व मजकूरहि ओळखतां येतात. शाईनें लिहिलेलीं अक्षरें जरी पुसून टाकण्यांत आलीं तरी शाईतील निरनिराळ्या द्रव्यांचें परमाणु कागदांवरच राहातात आणि त्यांच्यावर प्रकाशाच्या झोताचा परिणाम होत नाहीं. त्यामुळें बाजूच्या कागदावरची तेजस्विता त्या ठिकाणीं दिसत नाहीं.

खऱ्या आणि बनावट नोटांच्या कागदाचे रंग डोळ्यांना सारखे दिसले तरी अल्ट्रा-व्हायोलेट किरणांच्या प्रकाशांत रंगांतील फरक ताबडतोब दिसून येतात. कागद तयार करतांना वापरलेली निरनिराळीं द्रव्यें व कृति यांमुळें रंगांत फरक पडतो.

नोट प्रकाशांत धरली असतां दिसणारा राजाचा मुखवटा किंवा वॉटरमार्क हीं अल्ट्रा-व्हायोलेट किरणांच्या प्रकाशांत स्पष्ट दिसतात; बनावट नोटेवरील तेलकट पदार्थांच्या सहाय्यानें केलेली आकृति अधिक तेजस्वी दिसते; रबरच्या सहाय्यानें केलेली आकृति अदृश्य होते; आणि मेणाच्या सहाय्यानें केलेली आकृति पांढरट दिसते.

१९२६ मध्यें जर्मनींत परदेशी रेल्वे कंपन्यांच्या रोख्यांचा एकाएकी सुळसुळाट झाला; बाजारांत त्यांची किंमत चढविण्यासाठीं रोख्यांच्या मुदतीची तारीख बदलण्यांत आलेली होती. अल्ट्रा-व्हायोलेट किरणांच्या परीक्षेनें वरील रोख्यांचा बनावटपणा ताबडतोब उघडकीस आला. आज परदेशांतील कित्येक मोठ्या बँका अल्ट्रा-व्हायोलेट किरणांच्या सहाय्यानें प्रत्येक रोखा तपासून घेतात.

मोठ्या रकमेची बनावट नोट केल्याबद्दल एका इसमास पकडण्यांत आलें. त्यानें ताबडतोब कांहीं तरी गिळलें, तें जेव्हां बाहेर काढण्यांत आलें तेव्हां तें चोथा झालेल्या स्थितींत होतें. अल्ट्रा-व्हायोलेट किरण परीक्षेंत ती बनावट नोट ठरली.

---

### मद्रास प्रांतांतील शेतकऱ्यांच्या कर्जनिवारणाचा १९३८ चा कायदा

वरील कायदा करण्याचा प्रांतिक सरकारास अधिकार नाहीं, कारण ह्या कायद्यांतील कलमें निगोशिएबल एन्स्ट्रुमेंट्स ॲक्टास बाधक आहेत व त्यामुळें मध्यवर्ती विधिमंडळाच्या अधिकारक्षेत्रावर आक्रमण होत आहे, अशा अर्थाचें म्हणणें, प्रस्तुत प्रश्न फेडरल कोर्टापुढें अपिलांत चौकशीसाठी आला, त्यावेळीं हिंदुस्थान सरकारचे ॲडव्होकेट जनरल ह्यांनीं कोर्टापुढें मांडलें. मद्रासचे ॲडव्होकेट जनरल सर अलादि कृष्णस्वामी अयर ह्यांनीं मद्रास प्रांतिक सरकारची बाजू पुढें मांडली. शेतकऱ्यांच्या कर्जनिवारणाचे कायदे नवीन राज्यघटना अंमलांत येण्यापूर्वींसुद्धा प्रांतिक विधिमंडळांनीं केलेले आहेत व हुकूमनाम्याच्या रकमेंत पंचांनीं फेरफार केल्यास, तो प्रश्न कराराचे कक्षेंतून जाऊन न्यायदानाचे कक्षेंत येतो, असें त्यांनीं सांगितलें. दाव्याचें काम चालू आहे.

मुंबई इलाख्यांतील सहकारी चळवळीच्या केंद्रस्थानीं

असलेली

# शेतकऱ्यांची प्रांतिक बँक

म्हणजेच

## बॉम्बे प्रॉव्हिन्शियल् को-ऑपरेटिव् बँक, लिमिटेड.

( सहकारी कायद्यान्वयें नोंदलेली )

स्थापना १९११.

मुख्य कचेरी—सर विठ्ठलदास ठाकरसी मेमोरिअल बिल्डिंग ९, बेक हाउस लेन, कोट मुंबई.

शाखा

| | |
|---|---|
| १ बारामती ( जि. पुणें ) | १८ अकलूज ( जि. सोलापूर ) |
| २ सातारा ( „ सातारा ) | १९ विरमगांव ( „ अहमदाबाद ) |
| ३ इस्लामपूर ( „ „ ) | २० धुळें ( „ प. खानदेश ) |
| ४ कऱ्हाड ( „ „ ) | २१ दोंडाईचें ( „ „ ) |
| ५ तासगांव ( „ „ ) | २२ शिरपूर ( „ „ ) |
| ६ किर्लोस्करवाडी ( „ „ ) | २३ शहादें ( „ „ ) |
| ७ शिराळें ( „ „ ) | २४ नंदुरबार ( „ „ ) |
| ८ कोरेगांव ( „ „ ) | २५ साक्री ( „ „ ) |
| ९ वाई ( „ „ ) | २६ शिंदखेडें ( „ „ ) |
| १० अहमदनगर ( „ अहमदनगर ) | २७ तळोदें ( „ „ ) |
| ११ शेवगांव ( „ „ ) | २८ मालेगांव ( „ नाशिक ) |
| १२ कोपरगांव ( „ „ ) | २९ सटाणा ( „ „ ) |
| १३ बेलापूर ( „ „ ) | ३० कळवण ( „ „ ) |
| १४ राहुरी ( „ „ ) | ३१ लासलगांव ( „ „ ) |
| १५ भिवंडी ( „ ठाणें ) | ३२ नांदगांव ( „ „ ) |
| १६ पालघर ( „ „ ) | ३३ दोहद ( „ पंचमहाल ) |
| १७ कल्याण ( „ „ ) | ३४ कालोल ( „ „ ) |

## खेळतें भांडवल रु. २०००००००चे वर

या बँकेंत मुदतीच्या, चालू व सेव्हिंग बँक ठेवी स्वीकारल्या जातात

आणि

इलाख्यांतील बहुतेक सर्व प्रमुख ठिकाणीं हुंडीचा व्यवहार केला जातो.

या बँकेंत येणारा पैसा, शेतकरी व इतर अल्प उत्पन्नाचे लोक, यांच्या प्रत्यक्षपणें उपयोगी पडतो.

पूर्ण माहितीकरितां हेडऑफिस अगर शाखा-कचेऱ्यांस लिहा.

व्ही. एल्. मेहता,
मॅनेजिंग डायरेक्टर.

'अर्थ' ग्रन्थमाला

# बँका आणि त्यांचे व्यवहार

लेखकः—प्रो. वा. गो. काळे व श्री. श्री. वा. काळे

दुसरी आवृत्ति

या पुस्तकांत बँकांची घटना, व्यवहार व कामकाजाची पद्धति यांचें सोपपत्तिक विवेचन अत्यंत सोप्या मार्पेत केलेलें असून बँकांनीं आपला व्यवहार सुरक्षितपणें व फायदेशीर रीतीनें कसा करावा या बाबतींत अनेक महत्त्वाच्या व उपयुक्त सूचना केल्या आहेत. चलन, हुंडणावळ, आधुनिक तऱ्हेच्या बँका, मध्यवर्ती बँका, सहकारी बँका, सावकारी धंदा, ठेवी, डिस्कौंट व कर्जें इत्यादि महत्त्वाच्या प्रचलित व व्यावहारिक विषयांची सांगोपांग चर्चा त्यांत आली आहे. सध्याच्या परिस्थितींत प्रत्येक महाराष्ट्रीय नागरिकास वरील प्रश्नांची माहिती अत्यावश्यक असल्यानें मुद्दाम त्यांचें बोधप्रद विवेचन या पुस्तकांत केलें आहे. विषयाची मांडणी व विवेचनपद्धति सुलभ असल्यामुळें सदर पुस्तक सर्वसाधारण वाचकांसहि उपयुक्त होणार आहे. किंबहुना, त्यांचेकरितांच तें सहेतुक लिहिलें आहे, असें म्हणण्यास हरकत नाहीं. सबब, बँकांचे भागीदार, ठेवीदार, डायरेक्टर, गिऱ्हाइक, व्यवस्थापक आणि नोकर यांनीं विशेषतः हें पुस्तक अवश्य वाचावें.

दुसऱ्या आवृत्तींत आवश्यक त्या नवीन माहितीची भर घालणारीं अनेक प्रकरणें समाविष्ट केलीं असून रिझर्व्ह बँकेनें सुचविलेल्या कायद्याच्या मसुद्याचें विवेचनहि त्यांत आलेलें आहे.

किंमत १ रु. ८ आ. टपालखर्च वेगळा.

पुस्तकें मागविण्याचा पत्ताः—(१) व्यवस्थापक, अर्थ ग्रन्थमाला, पुणें ४.
(२) को-ऑपरेटिव्ह बुक डेपो, ९ बेक हाउस लेन, फोर्ट, मुंबई.

# रिसबूड ब्रदर्स, टेलर्स

वक्तशीरपणा व फिटिंग ह्याची गॅरंटी

Prop. M. V. Risbud, B. A.
सदाशिव पेठ हौदाजवळ, पुणें २.

# महिलांचें भरतकाम व विणकामाच्या सामानाचें दुकान

# एम्ब्रॉयडरी मार्ट

६१६ शनवार पेठ, पुणें २.

## निवडक बाजारभाव

बँक रेट (२८ नोव्हेंबर, १९३५ पासून) ... ३%

### सरकारी आणि निमसरकारी रोखे

| | |
|---|---|
| ३% करमाफ लोन (१९४५-५५) | ११२—६ |
| ४% १९४३ | १०४—९ |
| ३½% बिनमुदत | ९२—५ |
| ३½% १९४७-५० | १०२—० |
| ३% (१९६३-६५) | ९१-१० |
| २½% १९४८-५२ | ९५-१२ |
| ४% पोर्ट ट्रस्ट (लांब मुदत) | १०५—८ |
| ४% मुंबई म्युनिसिपल (लांब मुदत) | १०५—८ |
| ५% म्हैसूर कर्ज (१९५१-६१) | ११०—८ |
| ५% म्हैसूर कर्ज (१९५५) | १२१—० |

### मंडळ्यांचे भाव

(कंसातील पहिला आकडा भागाची दर्शनी किंमत, दुसरा आकडा वसूल झालेलें भांडवल व कंसानंतरचा आकडा वार्षिक डिव्हिडंड दर्शवितो.)

#### बँका

| | |
|---|---|
| बँक ऑफ इंडिया (१००-५०) ११% | १३६—० |
| बँक ऑफ बरोडा (१००—५०) १०% | १०२—८ |
| सेंट्रल बँक ऑफ इंडिया (५०—२५) ८% | ३९-१४ |
| इंपिरिअल बँक (५००) १२% | १५५०—० |
| बाँबे प्रॉ. को. बँक (५०) २ रु. | ५३—८ |
| रिझर्व्ह बँक (१००) ३½% | १०३-१२ |

#### वीज

| | |
|---|---|
| बाँबे ट्रॅम्वे ऑर्डि. (५०) १३% | १२९—४ |
| कराची (१००) ९% | २१५—० |
| पुणें इलेक्ट्रिक (१००) ९% | २१५—० |
| टाटा पॉवर ऑर्डि. (१०००) ५½% | १४९०—० |
| आंध्र व्हॅली ऑर्डि. (१०००) ७½% | १६५०—० |

#### रेल्वेज

| | |
|---|---|
| दौंड-बारामती (१००) ४½% | ९८—० |
| पाचोरा-जामनेर (१००) १½% | ६०—८ |
| अहमदाबाद प्रांतज (५००) ११½% | ९९७—८ |
| तापी व्हॅली (५००) ८% | ७६५—० |

#### इतर

| | |
|---|---|
| बेलापूर शुगर (५०) १० रु. | २१६—० |
| इन्व्हेस्टमेंट ट्रस्ट (१००-५०) २ रु. | ४५-१२ |
| सिंधिया स्टीम (१५) १ रु. | २१—२ |
| न्यू इंडिया विमा (७५-१५) १ रु. | ३९—६ |
| ओरिएंटल विमा (२००) १२५ रु. | ३६५०—० |
| टाटा आयर्न प. प्रे. (१५०) ६% | २३८—० |
| टाटा आयर्न दु. प्रे. (१००) १८ रु. १० आ. | १४६—८ |
| टाटा आयर्न ऑर्डि. (७५) १५ रु. | ३६८—० |
| टाटा आयर्न डिफर्ड (३०) ७५ रु. ११ आ. १ पै. | १८९२—८ |
| असोसिएटेड सिमेंट (१००) ५ रु. | १२५-१२ |

#### सोनें-चांदी

| | |
|---|---|
| सोनें (मिंट) प्रत्येक तोळ्यास | ४१-१३-३ |
| चांदी प्रत्येक १०० तोळ्यांस | ६१-११ |

सर्व तऱ्हेचें कापड छपाई व रंगाई (Calico Printing and Dyeing) करणारा कारखाना.
'पायोनियर डाइंग हाऊस'
कोचाचें कापड (Casement cloth) दारांचे पडदे, टेबल कव्हर इ. टिकाऊ रंगाचे, स्वदेशी तयार मिळतात. कारखानाः—
भिकारदास मारुती रोड, दातेवाडी, पुणें.

दि
बँक ऑफ महाराष्ट्र, लिमिटेड
सर्व तऱ्हेचा बँकिंगचा व्यवहार केला जातो
बँकेची शेअर-विक्री चालू आहे
मुख्य कचेरी
लक्ष्मी रोड, पुणें.
मुंबई शाखा — दलाल स्ट्रीट, कोट
पुणें शाखा — डेक्कन जिमखाना

देशी औषधें तयार करणारा प्रमुख कारखाना
पंडु, (अॅनिमिया) सर्व प्रकारच्या आजारानंतर येणाऱ्या
अशक्ततेवर
रक्तवर्धक
वापरा.
सर्वत्र मिळतें.
—ः केंद्रें ः—
पुणें, मुंबई, उमरावती, नागपूर, सांगली, कोल्हापूर, हुबळी.
आयुर्वेद रसशाळा पुणें, लि. पुणें ४.

कामगार ब्राम्ही तेल
शिरोमणि तेल
आवळ्याचे तेल
स्थापना १९०६
डोकें शांत रहातें. केंस मजबूत होतात.
गळण्याचे बंद होतात व मऊ रहातात.
धी बॉम्बे कलकत्ता ट्रेडींग कं. (मुंबई नं. ४)



तमाम दंत रोगांचा नाश करून दांत अतीस्वच्छ व बळकट ठेवणारी सर्वांत उत्तम!
पोरवाल
ब्लॅक टूथ पावडर
पोरवाल ॲन्ड को (रजिस्टर्ड) पूना सिटी

PARADKAR TAILORING ACADEMY POONA

सरकारी डिप्लोमा मिळाल्यानंतर पुढील प्रॅक्टिस व धंदेशिक्षण घेऊन
**जर्निमन टेलर व्हा.**
मुदत सहा ६ महिने, फीसह सर्व खर्च ६० रु., अगदीं नवीन विद्यार्थ्यास
फीसह सर्व ११० रु. मुदत १ वर्ष
**पराडकर टेलर्स ॲकेडिमी,** ६७१ सदाशिव, पुणें.

**N. V. WADNERKAR**

Gold & Silver Smith, Jeweller & Engraver,
Electro-plater & Manufacturer of Sporting
Trophies, Medals, Cups etc.
- - Raviwar Peth, Saraff Bazar, - -
POONA CITY.

**For Collegians**
**Wooden & Iron Furniture**
FOR SALE AND HIRE
Your Popular Old Shop
**SHEVAK BROS.**

| *Work-Shop Address:* | *Branch No. 1* |
|---|---|
| 153 Kasaba, | Shevak Quarters, near Fergusson College |
| Poona 2 | Poona 4 |

**'अर्थ' ग्रन्थमाला.**
१ बँका आणि त्यांचे व्यवहार
२ हिंदुस्थानची रिझर्व्ह बँक
३ व्यापारी उलाढाली

**अर्थशास्त्र**
लेखकः—प्रो. वा. गो. काळे व प्रो. दृ. गो. कर्वे
पृष्ठसंख्या सुमारें ३००, किंमत ३ रुपये
या ग्रंथांत अर्थशास्त्राच्या सर्वसामान्य सिद्धांतांचें विवेचन केलें आहे.

**महायुद्धाची जाणीव!** कपड्यांच्या खर्चांत काटकसर करा. एक वेळ येऊन स्वतःची खात्री करा व पैशाचा मोबदला घ्या.

बंबाचे माडीवर
# महिंद्रकर ब्रदर्स
तयार कपड्याचे व्यापारी
बुधवार चौक, पुणें

हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ११५।१ आर्यभूषण छापखान्यांत रा. विठ्ठल हरि बर्वे, यांनीं छापिलें व रा. श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनीं 'दुर्गाभिवास,' भांबुर्डा, घ. नं. ११७।११, पुणें शहर, येथें प्रसिद्ध केलें.